From the house of
HOME CABLE
HOME NET

मराठी
# होम टाइम्स

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 34 | Saturday, 18th Nov 2023 to 24th Nov 2023 | Price ~~Rs~~ 3/-

www.hometimes.in | www.facebook.com/hometimes.in | www.twitter.com/hometimes_news | hometimes.in | write2us@hometimes.in

# फेरीवाल्यांचे पात्रता धोरण ठरेना

## मुंबई महानगरपालिकेची तारीख पे तारीख

■ होम टाइम्स टीम

फेरीवाल्यांना पात्र ठरविण्याचे घोंगडे अजूनही भिजत पडलेले दिसत आहे. फेरीवाल्यांची ही समस्या पालिकेकडून गांभीर्याने घेतली जाताना दिसत नाही. एकीकडे शासन, प्रशासन पात्र फेरीवाल्यांच्या बाजूने आहे असे दाखवायचे आणि दुसरीकडे सरसकट सगळ्यांवरच कारवाया सुरु ठेवायच्या, असा दुटप्पीपणा सध्या सुरु आहे. त्यामुळे फेरीवाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली असून पालिकेचा असा वेळकाढूपणा म्हणजे त्यांच्यासाठी धोक्याची घटना तर नाही ना, असा संशय फेरीवाल्यांच्या मनात उभार राहू लागला आहे.

मुंबईत फेरीवाला धोरण लागू करण्यापूर्वी प्रशासनाला अनेक समस्या भेडसावत आहेत. ३२ हजार ४१५ फेरीवाल्यांना पात्र ठरवण्यासाठी हॉकर्स धोरण तयार करण्यासाठी गठित केलेल्या टाउन व्हेटिंग समितीकडून सूचना व हरकतींचे कामही पूर्ण झाले आहे. हा अहवाल येऊन पाच त्यानंतर महिने उलटले. मात्र अजूनही पालिका प्रशासनाला जाग आलेली नाही.

फेरीवाल्यांची फाईल मंजुरीसाठी पालिका आयुक्तांकडे पाठवण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे. ही फाईल पाठवूनही महिना उलटून गेलाय, तरीही अद्यापि यावरकोणताही निर्णय झाल्याचे ऐकिवात नाही. याबाबत पालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, याला आयुक्तांनी अद्याप मान्यता दिलेली नाही.

(पान ११ वर)



# उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर पालिका करणार दंडात्मक कारवाई

## तक्रारीसाठी पालिकेकडून हेल्प लाईन जारी



■ होम टाइम्स टीम

मुंबईमधील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी पालिका प्रशासनाकडून नवीन उपायोजना सुरू करण्यात आली आहे. कचरा जाळणाऱ्यांवर लगाम लावण्यासाठी पालिका प्रशासनाकडून एक हेल्पलाइन नंबरच जारी करण्यात आला आहे. कोणी अशा प्रकारचा कचरा जाळताना दिसल्यास त्याची थेट तक्रार करण्याची तरतूद पालिका प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

(पान २ वर)

# नोटीस न देताच वीज कंपनीने ऐन दिवाळीत केला ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित

## काँग्रेसच्या प्रयत्नांमुळे अंधाराचे झाले प्रकाशात रूपांतर

■ होम टाइम्स टीम

**दिवाळी हा सण दिव्यांचा, रोषणाईचा म्हणून ओळखला जातो. रोषणाईचा या सणात खूप महत्व असते. पण वीज पुरवठा करणाऱ्या वीज कंपनीला याचे काही देणेघेणे नाही. म्हणूनच कंपनीने ऐन दिवाळीच्या सणात ३० हुन अधिक कुटुंबीयांचा वीज पुरवठा खंडित करून या कुटुंबीयांची दिवाळी अंधार घालविण्याचा अमानवी प्रयत्न केला. मात्र काँग्रेसने हा प्रयत्न हाणून पाडीत या कुटुंबियांच्या घरात पुन्हा प्रकाश आणण्याचे मोलाचे काम केले.**

याबाबतचे अधिक वृत्त असे की, मुलुंडच्या जय शास्त्रीनगर परिसरात राहणाऱ्या ३० हून अधिक कुटुंबांचा वीज वितरण कंपनीने या ग्राहकांना कोणतीही आगाऊ सूचना न देता त्यांचा वीज पुरवठा खंडित केला होता. त्यानंतर काँग्रेसच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना याबाबतचा जाब विचारण्यात आला. त्यांना धारेवर धरण्यात आले. त्यानंतर या धिकाऱ्यांनी उपरोक्त कुटुंबीयांचा वीज पुरवठा पुन्हा सुरळीत केला. मात्र ऐन दिवाळीत वीज कंपनीने असे कृत्य केल्याने अधिकाऱ्यांबाबत लोकांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे. प्रत्यक्षात मुलुंड पश्चिम जय शास्त्री नगरमध्ये राहणाऱ्या ३० हून अधिक कुटुंबांचा वीजपुरवठा एमएसईबीने कोणतीही सूचना न देता खंडित केला होता. या भागात बिबट्या आणि साप यांसारखे प्राणी अनेकदा दिसतात. जे अनेकवेळा येथे



राहणाऱ्या नागरिकांसाठी धोकादायक बनले आहे. अशा वेळी येथे राहणाऱ्या नागरिकांना वीजपुरवठा खंडित झाल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्यानंतर येथे राहणाऱ्या कुटुंबांनी काँग्रेसच्या ब्लॉक कार्यालयात जाऊन आपल्या समस्या सांगितल्या. त्यानंतर काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल सातपुते यांच्या वतीने एमएसईबीच्या अधिकाऱ्यांशी या विषयावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर दिवाळीपूर्वी या कुटुंबांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. काँग्रेसने केलेल्या या कामाबाबत येथे राहणाऱ्या नागरिकांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच काँग्रेस कार्यकर्त्यांना पेढेही भरवण्यात आले. दरम्यान वीज वितरण कंपनीच्या या कृत्यावर काँग्रेसचे मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष चरणसिंग सप्रा यांनीही नाराजी व्यक्त करत केंद्र सरकारच्या कामकाजावर टीका केली. हे सरकार केंद्रीय एजन्सीचा वापर करून आंदोलकांना दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगतानाच पाच राज्यांमध्ये सुरू असलेल्या निवडणुकांच्या निकालांमध्ये काँग्रेसचा विजय होईल आणि २०२४ मध्येही काँग्रेसचे सरकार येईल असे होम टाइम्सला प्रतिक्रिया देताना सांगितले.

# उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर पालिका करणार दंडात्मक कारवाई

(पान १ वरून)

दिवाळीत मुंबईतल्या प्रदूषणाचा टप्पा धोकादायक पातळीकडे वळत असल्यामुळे पालिका प्रशासनाकडून उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. याचाच एक भाग म्हणून कचरा जाळणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. त्यामुळे कोणीही कचरा जाळत असल्यास त्याच्याविरुद्ध 'मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई हेल्पलाइन ८१६९६-८१६९७ वर छायाचित्रासोबत तक्रार नोंदवा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. शहरात व काही उपनगरांमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी अनेकदा कचरा जाळला जातो. त्यामुळे विषारी धूर वातावरणात पसरत आहे. परिणामी कर्करोग, यकृताचे आजार, मलावरोध, अस्थ श्वसनावरोध, मेंदूविकार होण्याची दाट शक्यता असल्याची माहिती तज्ज्ञ देतात, महत्त्वाचे म्हणजे तज्ज्ञांचे मत विचारात घेऊन पालिकेने प्रदूषणाच्या नव्या नियमावलीमध्ये कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्य सरकारच्या पर्यावरण व

वातावरणीय बदल विभागाने २६ ऑक्टोबर रोजी वायू प्रदूषण नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यातील अनुक्रमांक ९ मधील अनुपालन करण्याच्या उद्देशाने पालिकेने व्हॉट्सप सेवा क्रमांकावर तक्रार नोंदविण्यासाठी टॅबमध्ये 'कचरा जाळणे' हा पर्याय अद्ययावत केला आहे. उघड्यावर कचरा जाळणे, हा पर्यावरणविषयक कायदे आणि भारतीय दंड विधानानुसार गुन्हा आहे. त्यासाठी कायद्यात कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. मात्र, नागरिक अनेकदा उघड्यावर कचरा जाळून विल्हेवाट लावतात आणि पर्यायाने कायद्याचे उल्लंघन करतात. प्रदूषणात भर पाडणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिला आहे.

दरम्यान मुलुंडचे आमदार मिहीर कोटेचा यांनी भांडुप सोनापूर परिसरामध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या अनधिकृत गाळेधारकांवर कार्यवाही करण्याची मागणी या आधीही केली होती. या ठिकाणी प्लास्टिक कचरा मोठ्या प्रमाणात जाळला जात असतो. त्यामुळे मुलुंड, खिंडीपाडा आणि भांडुप, सोनापूर परिसरामध्ये पालिका प्रशासनाकडून वेळोवेळी धाडी टाकून या ठिकाणी असलेल्या दोषी व्यावसायिकांवर प्रदूषण पसरविण्यासंदर्भात कार्यवाही करावी अशी मागणी देखील केली होती. त्यामुळे आता नव्या आदेशानुसार पालिका प्रशासन या ठिकाणी नेमकी काय कार्यवाही करते हे पाहणे गरजेचे आहे

# पालिका आणि वाहतूक विभागाचे डोके ठिकाणावर आले

## पूर्वेकडील 'नो पार्किंग'चे बोर्ड काढण्यास सुरुवात

■ **होम टाइम्स टीम**

नागरिकांकडून नो पार्किंगच्या बोर्डवर घेण्यात आलेल्या आक्षेपानंतर वाहतूक विभाग आणि पालिका प्रशासनाकडून मुख्य रस्ते वगळता इतर रस्त्यांवर लावण्यात आलेले पार्किंगचे फलक हटविण्यास सुरुवात केली आहे. येत्या आठवड्याभरात या संपूर्ण परिसरातील नो पार्किंगचे फलक हटविण्यात येणार आहेत. त्यामुळे पूर्वेकडील लोकांची पार्किंग समस्या काही प्रमाणात मार्गी लागणार असल्याचे दिसते आहे.

मुलुंड पूर्वेकडे पार्किंगचा मुद्दा नेहमीच कळीचा मुद्दा ठरला आहे. रस्त्यावर बेसिस्तीची पार्किंग नसावी यासाठी पालिका प्रशासन आणि वाहतूक विभाग यांच्याकडून ठीक ठिकाणी नो पार्किंगचे बोर्ड लावण्यात आले आहेत. मात्र मुलुंड पूर्वेकडे पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे खरेदी करण्यासाठी तसेच इतर कामांसाठी सोबत आणलेली वाहने पार्क करण्यासची कोणतीही सुविधा नाही. परिणामी वाहनचालकांकडून रस्त्यावरच गाड्या पार्क केल्या जातात. त्यामुळे वाहतूककोंडी होते. याबाबतच्या अनेक तक्रारी वाहतूक विभागाकडे आल्या आहेत. त्यामुळे पालिका आणि वाहतूक विभागाकडून वाहन पार्क करणाऱ्यांवर थेट कार्यवाही केली जाते. अनेकांना ऑनलाइन दंड पाठविला जात आहे. या ठिकाणी गाडी पार्किंग केल्या जाऊ नयेत यासाठी पालिका आणि वाहतूक विभागाच्या वतीने नो पार्किंग बोर्ड लागण्यात आले. मात्र अशा बोर्डमुळे वाहतूक पोलिसांच्या कारवाईला अधिक वेग आल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरू लागले. त्यामुळे आधी पार्किंगची सुविधा उपलब्ध करून द्या, नंतर दंड आकारा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. लोकांचा वाढता असंतोष पाहता याविरोधात मनसेकडून आंदोलन करण्यात आले होते. होम टाइम्सनेही या संदर्भात कांजूर येथील वाहतूक विभागाकडे या बोर्डबाबतची विचारणा केली होती. लोकांना गाड्या पार्किंगसाठी जागा नसताना ठिकठिकाणी नो पार्किंगची बोर्ड लावण्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला असल्याचे होम टाइम्सने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. लोकांचा हा असंतोष पाहता कांजूर येथील वाहतूक विभागाने नो या ठिकाणी लावण्यात आलेले नऊ नो पार्किंगची बोर्ड हटविण्याची तयारी दाखविली. तसेच केळकर महाविद्यालय परिसर आणि इतर ठिकाणावरील नो पार्किंगचे फलक हटविण्यातही आले. फक्त मुख्य रस्त्यांवरील फलक हटविण्यात आले नाहीत. यासोबतच सदर रस्त्यांवरील नो पार्किंगचे फलक हटवून पार्किंगची व्यवस्था देखील करण्यात येण्याचे आश्वासन वाहतूक पोलिसांकडून देण्यात आले आहे.

> **"नो पार्किंगच्या संदर्भात आम्ही वेळोवेळी भूमिका घेतली होती. त्या संदर्भात पालिका प्रशासन आणि वाहतूक विभाग यांना निवेदन दिले होते. स्वाक्षरी मोहीम देखील हाती घेतली होती. या प्रश्नावर वाहतूक विभागाने सकारात्मक पाऊल उचलून काही ठिकाणांवरील नो पार्किंगचे फलक हटविण्यात येत आहेत. परंतु फक्त दुखावू कार्यवाही न करता नागरिकांसाठी पर्यायी पार्किंगची व्यवस्था उपलब्ध करून देणे ही जबाबदारी सुध्दा पाळणे गरजेचे आहे.**
>
> **– सत्यवान दळवी, मनसे उपाध्यक्ष, मुलुंड**

# मुलुंडमधील दुहेरी पार्किंगवर वाहतूक विभागाची करडी नजर

## १८ हजारांहून अधिक वाहनचालकांकडून केला दंड वसूल

■ **होम टाइम्स टीम**

**मुलुंडमधील वाढती वाहतूककोंडी आणि दुहेरी पार्किंगची समस्या पाहता वाहतूक विभाग आता ॲक्शन मोडवर आला आहे. या विभागाने मुलुंडमध्ये १८ हजारांहून अधिक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. ही कारवाई सुरूच राहणार असून कारवाई टाळायची असेल तर वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.**



मुंबईत दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून या वाढत्या वाहनसंख्येमुळे अनेकवेळा नागरिकांना वाहतूककोंडीला सामोरे जावे लागते. बेकायदा पार्किंग, दुहेरी पार्किंग अशा विविध कारणांमुळे बहुतांश वेळा ही वाहतूक कोंडी दिसून येते. मुलुंडमध्येही नागरिकांना अनेकदा अशाच समस्यांना सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर आता मुलुंड वाहतूक विभाग सतर्कतेच्या मार्गावर आला असून कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. आकडेवारीनुसार १ जानेवारी ते १५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत मोटर वाहन कायदा १२२ अंतर्गत १८ हजार ५४८ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. मोटर वाहन कायदा १२२ अंतर्गत दुहेरी पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाते. त्यामुळे नागरिकांना न्यायालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत. यासोबतच काही वेळा अशी पार्किंग अपघाताचे कारण बनते.

मुलुंड पूर्व असो वा पश्चिम दोन्ही ठिकाणच्या परिसरातील परिस्थिती सारखीच आहे. यावर्षी १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत ४६२ वाहनचालकांवर ही कारवाई करण्यात आली आहे. मुलुंड पश्चिम, सर्वोदय नगर, आरआरटी रोड, जेएन रोड, मुलुंड कॉलनी या भागात नो पार्किंगच्या ठिकाणी वाहने उभी करणाऱ्यांवर सर्वाधिक कारवाई करण्यात आली. तसेच मुलुंड पश्चिम आणि मुलुंड पूर्व येथे वाहतूक विभागाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. मुलुंड आणि मुंबईत राहणाऱ्या नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच दुहेरी पार्किंग करणे टाळावे, जेणेकरून अपघात आणि कारवाई टाळता येईल, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

## संपादकीय ▪ हेमांशू कोठारी

# आंतरराष्ट्रीय पुरुष दिन: घ्या आरोग्याची काळजी

स्त्री असो वा पुरुष, आजकाल सर्वांना समान दर्जा दिला जातो. आपण दरवर्षी महिला दिन साजरा करतो तसाच आता आंतरराष्ट्रीय पुरुष दिनही साजरा करण्याचा ट्रेंड सुरू झाला आहे. आंतरराष्ट्रीय पुरुष दिन दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे १९९८ मध्ये याची सुरुवात झाली. डॉ. जेरोम तिलक सिंग यांनी पुढाकार घेऊन पुरुषांच्या योगदानाला एक नाव दिले. तेव्हापासून त्यांच्या वडिलांचा वाढदिवस म्हणजेच १९ नोव्हेंबर हा दिवस जगभरात पुरुष दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ. जेरोम यांनीच 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिना'ची सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा एक महत्त्वाचा उत्सव आहे, ज्याचा उद्देश पुरुषांचे हक्क, समानता आणि सुसंवाद वाढवणे आहे. दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची थीम वेगळी असते. गेल्या वर्षी त्याची थीम होती 'हेल्पिंग मेन अँड बॉयज'. या वर्षी २०२३ ची थीम, शून्य पुरुष आत्महत्या, पुरुषांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी करून आणि जीवनावर सकारात्मक नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांना समर्थन देऊन एका महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करत आहे. यासोबतच पुरुषांना त्यांच्या आरोग्याबाबत जागरुक करणे हाही मुख्य उद्देश आहे. हा दिवस पुरुषांच्या आरोग्यासोबतच सामाजिक आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करण्याचे माध्यम ठरू शकतो. या विषयावर चर्चा करून त्यावर उपाय सांगितल्याने सामाजिक संदेश वाढण्यास मदत होऊ शकते. यानिमित्ताने लोकांना जागरूक करण्यासाठी आणि एकोपा वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात. हा दिवस साजरा करून समाजात एकोपा, सौहार्द आणि सामाजिक न्यायाची भावना वाढीस लागते. आजच्या धावपळीच्या जीवनात पुरुष खूप व्यस्त झाला आहे. पूर्वीच्या काळी पुरुष बाहेर कामाला जायचे आणि नंतर घरी येऊन आराम करायचे. पण सध्याच्या काळात पुरुषांची विचारसरणीही बदलली आहे, नात्यातील समानतेमुळे महिलांसोबत पुरुषांचीही जबाबदारी वाढली आहे. तेही प्रत्येक कामात आपली उपस्थिती दर्शवतात आणि घरापासून बाहेरची सर्व कामे करतात. या व्यस्त जीवनात त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे. पुरुषांना मद्यपान, सिगारेट इत्यादी सवयी असतात, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वयाच्या आधी परिणाम होऊ लागतो. आजच्या वर्क कल्चरमध्ये टेन्शनची कमतरता नाही, त्यामुळे वयाची ३५ वर्षे ओलांडल्याबरोबरच पुरुषांनी आपल्या आरोग्याबाबत जागरुक होणे गरजेचे झाले आहे. पुरुषांमधील हृदयविकाराचा झटका किंवा इतर आजारांचे वाढते प्रमाण पाहिल्यास आजच्या कार्यसंस्कृतीत लोकांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज वाढली आहे. ताणतणाव, वाढती दैनंदिन दिनचर्या आणि झपाट्याने वाढणारे तंत्रज्ञान जग यामुळे लोकांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे बनले आहे. पुरुषांनी वयाची ३५ वर्षे ओलांडल्यावर त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. नियमित व्यायाम केल्याने शारीरिक स्वास्थ्य टिकून राहते आणि तणाव कमी होतो. त्यांच्या आहारात फळे, भाज्या, धान्ये, प्रथिनेयुक्त पदार्थ अशा पौष्टिक पदार्थांचा समतोल आहार असावा. आपल्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी नियमितपणे डॉक्टरांकडे जाणे महत्वाचे आहे. पुरुषांनी नियमित आणि पुरेशी झोप घेतली पाहिजे, कारण ती त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाची आहे. तुम्ही तुमच्या व्यस्त दिनचर्येत योग, ध्यान यांचा समावेश करावा ज्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होईल. आजकाल पुरुष जास्त ताणतणाव किंवा व्यवसायात नुकसान झाल्यावर आत्महत्या करण्याचा विचार करतात. पण त्यांची तब्येत चांगली राहिली तर कदाचित ते या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करू शकतात. या सर्व कृती माणसाला वाढत्या वयातही निरोगी आणि सतर्क जीवन देऊ शकतात. तुम्हा सर्वांना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या शुभेच्छा, त्यासाठी सजग राहा, निरोगी राहा.

# काँग्रेसने अनोख्या पद्धतीने साजरा केला 'बालदिन'



▪ होम टाइम्स टीम

मुंबई काँग्रेसने अनोख्या पद्धतीने बालदिन साजरा केला. मुंबईतील रस्त्यावरील मुलांना दिवाळीत तयार केलेले ब्लँकेट आणि स्वादिष्टपदार्थांचे वाटप करण्यात आले. काँग्रेसच्या अनोख्या बालदिनामुळे रस्त्यावरील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिनाचा सण साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर १४ नोव्हेंबर रोजी मुंबई काँग्रेसतर्फे हा उत्सव अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मुंबई काँग्रेसने रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना ब्लँकेट आणि विविध प्रकारच्या दिवाळी भेटवस्तू दिल्या. यंदा दिवाळीच्या मुहूर्तावर आलेल्या बालदिनाच्या निमित्ताने मुंबई आणि मुलुंडच्या रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांसोबत हा सण साजरा करण्यात आला. एलबीएस रोड, मुलुंड पश्चिम आर मॉल, अंबाजी धाम, मुलुंड पश्चिम आणि म्हात्रे नगर परिसर, मिठागर रोड, मुलुंड पूर्व येथे ब्लँकेट आणि डिश देण्यात आल्या. याप्रसंगी काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मुलुंडच्या कालिदास नाट्यगृहामध्ये मुलुंड सेवा संघाच्या वतीने मा. नगरसेवक प्रकाश गंगाधरे यांनी दिवाळी पहाटचे आयोजन केले होते. दिवाळीच्या निमित्ताने भावगीत आणि भक्ती गीतांचा अनोखा संगम या कार्यक्रमांमध्ये रसिकांना अनुभवता आला. भाजपचे मुंबई प्रदेश अध्यक्ष ॲड. आशिष शेलार, खासदार मनोज कोटक यांनी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# दिवाळी सण मोठा, प्रदूषणाचा नाही तोटा

## उच्च न्यायालयाचे आदेश धाब्यावर बसवून लोकांनी केली फटाक्यांची आतिषबाजी



**■ होम टाइम्स टीम**

**दिवाळीच्या सणात मुंबई उच्च न्यायालयाने जारी केलेल्या नियमांची मुंबईत सर्रासपणे पायमल्ली झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मध्यरात्री१२:००नंतरही फटाक्यांची आतषबाजी सुरूच होती. त्यामुळे मुंबईतील हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक आणखी घसरला आहे. या निर्देशांकाची नोंद खराब श्रेणीत नोंदवण्यात आली. श्वसनाचा त्रास होत असलेल्या नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.**

मुंबई उच्च न्यायालयाने रात्री ८ ते १० या दोन तासाच्या वेळेतच फटाके फोडण्यास, विक्री करण्यास परवानगी दिली होती. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने दिवाळी सणाबाबत दिलेल्या या आदेशाचे सर्रास उल्लंघन करण्यात आले. रात्री १२:०० नंतरही मुंबईत फटाके फोडण्याचे प्रकार सुरूच होते. त्यामुळे मुंबईतील हवेची गुणवत्ता २५० च्या जवळपास नोंदवली गेली, जी हानिकारक श्रेणीत येते. आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षात मुंबईत या वर्षी सर्वाधिक डेसिबल ध्वनिप्रदूषणाची नोंद झाली आहे. जे ११७.२ आहे. २०२२ मध्ये ध्वनी प्रदूषणाची पातळी १६२ डेसिबल होती आणि २०२१ मध्ये ती १०० डेसिबल होती. तर २०२० मध्ये तो १०५ डेसिबल होती. तर फेब्रुवारी २०१९ मध्ये ११२ डेसिबल आवाजाची नोंद झाली. मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या ७८४ लोकांविरुद्ध एफआयआर नोंदवला असून त्यांच्याकडून दंडही वसूल करण्यात आला आहे. मात्र, मुंबईत दिवाळीचा सण आणि गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली फटाक्यांची आतषबाजी यामुळे मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेवरही परिणाम झाला असून मुंबईचा हवेचा दर्जा निर्देशांक १५० वरून २५० वर पोहोचला आहे, यामुळे ज्येष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांकडून श्वासोच्छवासाचा त्रास होत असलेल्यां नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये आणि आवश्यकतेनुसार मास्क वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महापालिका २० नोव्हेंबरपासून सार्वजनिक ठिकाणी करणार मधुमेहाची विशेष तपासणी

**■ होम टाइम्स टीम**

जागतिक मधुमेह दिनानिमित्त मुंबई महापालिकेतर्फे २० नोव्हेंबरपासून नवीन मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याअंतर्गत मुंबईतील गजबजलेल्या भागात नागरिकांची मोफत मधुमेह तपासणी केली जाणार आहे. मधुमेहाने त्रस्त असलेल्या नागरिकांना तज्ज्ञांकडून आहार योजनाही दिली जाणार आहे.

दिवाळीनंतर मुंबई महापालिकेने मधुमेह तपासणीसाठी नवी मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. १४ नोव्हेंबर रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला. या सणांनंतर जागतिक मधुमेह दिन साजरा केला जाणार आहे. या संदर्भात पालिकेने मोफत मधुमेह तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर आरोग्य विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, दिवाळीच्या दिवशी लोक मिठाई आणि इतर पदार्थांचा भरपूर आस्वाद घेतात. अशा परिस्थितीत कधीकधी लोकांची साखरेची पातळी देखील वाढते. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. जेणेकरून स्क्रीनिंगमुळे मधुमेह वेळेवर ओळखता येईल. २० नोव्हेंबरपासून मुंबईतील रेल्वे स्टेशन, मॉल्स आणि इतर ठिकाणी हे मोफत स्क्रीनिंग आयोजित केले जाईल. तपासणी दरम्यान संशयास्पद व्यक्ती आढळल्यास, त्याला/तिला घराजवळील आपला दवाखान्यात पाठवले जाईल आणि मधुमेहाची पुष्टी झाल्यानंतर, त्याला/तिला मोफत औषधे दिली जातील आणि आहारतज्ज्ञांकडून आहार योजना देखील दिली जाईल.

## मुलुंडमध्ये बेकायदा फटाके विकणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**■ होम टाइम्स टीम**

मुलुंड पूर्व आणि पश्चिमेला बेकायदेशीरपणे फटाके विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या स्टॉलधारकांकडून फटाकेही जप्त करण्यात आले. आता पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

दिवाळीचा सण जवळ आला की, मुंबईत अनेक ठिकाणी फटाके कायदेशीररीत्या आणि इतर ठिकाणी बेकायदेशीरपणे विकले जातात. या पार्श्वभूमीवर मुलुंड पोलीस सतर्क झाले असून दिवाळीच्या काळात बेकायदेशीरपणे फटाके विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. मुलुंड पूर्व आणि पश्चिम असे एकूण चार गुन्हे दाखल झाले आहेत. यातील पहिला गुन्हा ४७ वर्षीय मुलुंड रहिवासी राजेश उबाळे याच्यावर दाखल करण्यात आला

**भादंवि कलम २८६ अन्वये गुन्हा दाखल**

आहे. मुलुंड पश्चिम एमजी रोडवर रात्री ११ वाजता तो फटाके विकत होता. दुसरा गुन्हा मुलुंड पश्चिम जेएन रोडवर बेकायदेशीर स्टॉल लावून फटाक्यांची विक्री करणाऱ्या ४७ वर्षीय श्रीनिवास जैस्वाल याच्याविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. मुलुंड पश्चिम सोबतच बेकायदेशीर फटाक्यांची विक्री केल्याप्रकरणी ३९ वर्षीय एकनाथ शिंदे याच्याविरुद्ध भादंवि कलम २८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इतकेच नाही तर आरोपींकडून ४९०० मापाचे फटाके जप्त करण्यात आले आहेत. म्हाडा कॉलनीजवळ तसेच आरआर एज्युकेशनजवळ बेकायदेशीरपणे फटाके विक्री केल्याप्रकरणी ५८ वर्षीय शांताराम इनबरकर यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून कारवाई टाळावी, असे आवाहन पोलिसांनी केले होते.

# लोकल आणि एक्स्प्रेस गाड्यांमध्येही गुंजणार फेरीवाल्यांचा आवाज

## रेल्वेत फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास मिळणार परवानगी

■ **होम टाइम्स टीम**

मध्य रेल्वे लवकरच कायदेशीर फेरीवाल्यांना उपनगरीय गाड्या आणि एक्स्प्रेस गाड्यांमध्ये व्यवसाय चालवण्याची संधी देणार आहे. या संदर्भात २८ नोव्हेंबर रोजी ई-लिलावाचेही आयोजन करण्यात आले आहे. रेल्वेतर्फे प्रथमच ही मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे काही प्रमाणात बेरोजगारी कमी होण्यास मदत मिळणार आहे.

रेल्वे गाड्यांमधून प्रवास करताना अनेकवेळा मुंबईकरांसह इतर नागरिकांना बेकायदेशीरपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचा सामना करावा लागतो. त्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने या फेरीवाल्यांना गाड्यांमध्ये रीतसर व्यवसाय करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने उपनगरीय लोकल, लांब पल्ल्याच्या मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांमध्येफेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. या कामासाठी २८ नोव्हेंबर रोजी मध्य रेल्वेतर्फे ई-लिलाव होणार आहे. मात्र, या कामासाठी फेरीवाल्यांना परवाना शुल्क भरावे लागणार आहे. यानंतर फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करता येणार आहे. लांब पल्ल्याच्या मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांसाठी एकूण ५०० परवानाधारक विक्रेत्यांना परवानगी दिली जाईल तर १,५०० विक्रेत्यांना उपनगरीय लोकल गाड्यांसाठी परवाना दिला जाईल.

तथापि, महानगरी एक्स्प्रेस, राजधानी आणि दुरांतो सारख्या प्रीमियम एक्सप्रेस गाड्यांमध्ये विक्रेत्यांना परवानगी दिली जाणार नाही. या परवान्याची वैधता तीन वर्षांसाठी असेल. परवानाधारक विक्रेत्यांना लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये पॅकेज केलेले अन्न, पिण्याचे पाणी यासह उपभोग्य वस्तूंची विक्री करण्यास मनाई असेल, परंतु उपनगरीय लोकल गाड्यांमध्ये तसे करण्याची परवानगी असेल. तथापि, प्रवासाशी संबंधित वस्तू जसे की मोबाइल/लॅपटॉप उपकरणे, स्टेशनरी आणि वर्तमानपत्रे/मासिक/पुस्तके एक्स्प्रेस आणि लोकल दोन्ही गाड्यांमध्ये विक्रीसाठी परवानगी असेल. मध्य रेल्वेतर्फे अशा प्रकारची मोहीम प्रथमच सुरू करण्यात येणार आहे.

# बेस्ट कंत्राटी कामगारांना मिळाला दिवाळी बोनस

## कामगारांमध्ये पसरले आनंदाचे वातावरण

■ ***होम टाइम्स टीम***

***महाराष्ट्र राज्य कामगार संघटनेच्या ७५०० कर्मचाऱ्यांची दिवाळी सरतेशेवटी का होईना पण गोड झाली. कारण त्यांना दिवाळीचा बोनस मिळाला. बोनसची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होऊ लागली आहे. या बोनसमुळे कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे कामगार संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी मुलुंड बेस्ट आगाराबाहेर एकमेकांना पेढे भरून जल्लोष साजरा केला.***

*महाराष्ट्र राज्य बेस्ट कर्मचारी संघटनेचे कर्मचारी दिवाळी बोनस आणि इतर मागण्यांसाठी बेस्ट प्रशासनाकडे सततचा पाठपुरावा करत होते. त्यांच्या या पाठपुराव्याला अखेर यश आले. बेस्टच्या ७५०० कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड झाली. बेस्ट मधील वाहक, चालक, टेक्निशियनस अशा कंत्राटी कामगारांसाठी हंसा, स्विच, डागा, मातोश्री कंत्राटदारांकडून कंत्राटी पद्धतीवर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. दरवर्षी या कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनससाठी बेस्ट प्रशासनाकडे पाठपुरावा केला जातो. यंदाही बोनस मिळविण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्याला यश मिळाले. बेस्ट प्रशासनाने या कंत्राटदारांच्या खात्यांमध्ये ८.३३% प्रत्येक कर्मचाऱ्या मागे जमा केले. त्यामुळे अखेर सर्व संस्थानचा हा बोनस जमा करण्यात आला आणि त्यातील ८० टक्के कर्मचाऱ्यांना त्यांची बोनस ची रक्कम प्राप्त देखील झाली.*



*८० टक्के कर्मचाऱ्यांना त्यांची बोनसची रक्कम प्राप्त झाली आहे. मात्र डागा या कंत्राटी कंपनीकडून कर्मचाऱ्यांच्या खात्यात हा बोनस जमा झाला नव्हता. त्यासाठी बेस्ट संघटने कडून आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात आला होता. त्यामुळे अखेर बेस्ट प्रशासनाने डागा कंपनीच्या खात्यातही बोनसचे पैसे जमा केले. परिणामी उशिरा का होईना या कंपनीकडून मिळणारे बोनस आता उर्वरित कर्मचाऱ्यांच्या खात्यातही जमा होऊ लागले आहेत. म्हणून मुलुंड बेस्ट आगाराबाहेर कंत्राटी बेस्ट वाहक, चालक, कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त करत एकमेकांना पेढे भरून जल्लोष साजरा केला.*

# मुलुंडमध्ये कालीचौदसचा सण मोठ्या उत्साहात झाला साजरा

■ **होम टाइम्स टीम**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मुलुंड पश्चिम वसंत गार्डनमध्ये माँ काली मित्र मंडळातर्फे कालीचौदस सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या ठिकाणी माँ कालीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने आले होते.

दिवाळीच्या रात्री कार्तिक कृष्ण पक्ष चतुर्दशीनंतर अमावस्येला भक्तिभावाने माँ काली पूजेचे आयोजन केले जाते. यानिमित्त विविध काली मंदिरात तसेच अनेक ठिकाणी माँ कालीची मूर्ती बसवून पूजा केली जाते. मुलुंडमध्ये दरवर्षी हा भव्य कार्यक्रम आयोजित केला जातो. यंदा वसंत गार्डन माँ काली मित्र मंडळातर्फे मंडपात माँ श्यामा काली मातेची ५.५ फुटांची मूर्ती बसवण्यात आली होती. याशिवाय जवळच रामकृष्ण परमहंस आणि त्यांची पत्नी शारदामणी यांचा ३ फुटांचा पुतळाही बसवण्यात आला होता. या मंडळाचे संस्थापक पिनाकी सारंगी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव गेल्या १६ वर्षांपासून या पद्धतीने साजरा केला जात आहे. १२ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या तीन दिवसीय उत्सवात दररोज काली देवीची पूजा करण्यात आली. भाविकांसाठी दररोज भोगाचेही आयोजन करण्यात आले होते. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच १४ नोव्हेंबर रोजी सिंदूर उत्सव करून मातेच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले आणि पवई तलावात मातेच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

> ***“ गेल्या १६ वर्षांपासून हा उत्सव श्रद्धेने व भक्तिभावाने साजरा केला जात असून या उत्सवात सर्व जाती धर्मांचे लोक सहभागी होतात. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर १२ नोव्हेंबर रोजी या तीन दिवसीय उत्सवाची सुरुवात झाली. कोरोना महामारीनंतर मूर्तीची उंची वाढवण्यात आली असून उत्सवात भाविकांचा उत्साह कायम आहे.***
>
> ***– पिनाकी सारंगी,***
> ***संस्थापक/ अध्यक्ष, काली माता मित्र मंडळ, मुलुंड***






# जसराज ॲन्टिक ®

**सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)**



**सणासाठी विशेष ऑफर**

**10% to 40% डिसकाउंट**

**१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध**

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेटेंड ब्युटी लाँग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

**जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे**

**नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर**

**सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट**

**CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370**

Note: Before coming pl buzz on Cell.

# रेल्वेत नोकरी देण्याच्या नावे बेरोजगाराची ७८ हजारांची फसवणूक

## नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ **होम टाइम्स टीम**

रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून भांडुप येथील रहिवाशाची ७८,५०० रुपयांची फसवणूक झालाच प्रकार घडला आहे. फसवणूक झालेल्या व्यक्तीने याबाबत मुलुंडच्या नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रताप कहार हे भांडुप येथील रहिवासी आहेत. आठ महिन्यांपूर्वी त्यांची ओळख निकुंज नागदा सोबत झाली होती. त्याने प्रतापला रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. त्याबदल्यात अधिकाऱ्याला आगाऊ पैसे द्यावे लागतील असे सांगितले. नोकरी संदर्भात प्रतापला मुलुंडमध्ये रेल्वे अधिकाऱ्याला भेटण्याची व्यवस्था केली जाईल अशी थापही मारली. रेल्वेत नोकरी मिळण्याच्या लालसेपोटी प्रतापने त्याला पैसे देण्याचे मान्य केले. मे महिन्यात मुलुंड पूर्व मंडप हॉटेलजवळ प्रताप याने निकुंजच्या खात्यात ७८ हजार ५०० रुपये ट्रान्सफर केले. काही वेळ वाट पाहिल्यानंतर निकुंजने त्याला सांगितले की, रेल्वेचे अधिकारी बाहेर गेले असून ते नंतर येणार आहेत. त्यानंतर ते दोघेही तेथून निघून गेले. मात्र त्यानंतर निकुंज प्रतापला टाळू लागला.यावरून आपली फसवणूक झाली असे लक्षात आल्यावर प्रतापने नवघर पोलीस ठाण्यात जाऊन निकुंजविरुद्ध भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल केला. याप्रकरणी नवघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# वैशाली नगरात चोरट्यांनी डी मार्ट रेडी शॉप फोडले

## पोलिसांकडून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू

■ **होम टाइम्स टीम**

दिवाळीच्या निमित्ताने दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते. ही उलाढाल लक्षात घेत चोरट्यांनी अशा दुकानांकडे नजरा वळविल्या आहेत. त्यातूनच घोरपड्यांच्या घटना समोर येत आहेत. मुलुंडमध्ये अशाच प्रकारची घटना रविवारी समोर आली.

मुलुंडच्या वैशाली नगर परिसरात रविवार, ११ नोव्हेंबर रोजी शालिनी गरजेकर या नेहमीप्रमाणे सकाळी त्यांच्या डी मार्ट रेडी शॉपमध्ये गेल्या होत्या. त्यावेळी त्यांना त्यांच्या शॉपच्या शटरच्या दोन्ही बाजू उचकटलेल्या आढळून आल्या. त्यांनी शॉपचे शटर उघडून आत पाहणी केली असता, आतील साहित्य विसकटलेले दिसून आले. तसेच ज्या ठिकाणाहून शटर तोडण्यात आले होते त्या ठिकाणाहून जवळच असलेल्या लॉकरची छेडछाड देखील झालेली दिसून आली. मात्र लॉकर उघडून पाहिले असता आतील रक्कम मात्र शाबूत असल्याचे आढळून आले. चोरांनी चोरीच्या उद्देशाने शटर तोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, परंतु आत प्रवेश केल्यावर त्यांना कुठल्याही प्रकारे दुकानातील रोख रक्कमेची चोरी करता आली नाही. त्यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. परंतु अशा प्रकारच्या चोरीच्या घटना मुलुंडच्या इतरही ठिकाणी घडल्याची माहिती समोर येत आहे. ऐन दिवाळीच्या दिवसात इलेक्ट्रिक शॉप्स, अन्नधान्यांची दुकाने, कपड्यांच्या दुकाने यामध्ये पैशांची चांगली उलाढाल झाल्याने चोरांनी अशा दुकानांना टार्गेट केल्याचे दिसतेय.

# तोतया पोलिसांनी व्यापाऱ्याला लुबाडले

## १.९२ लाखांचे दागिने घेऊन भामटे लंपास

■ **होम टाइम्स टीम**

**पोलीस असल्याची बतावणी करत मुलुंड मधील एका व्यापाऱ्याला तब्बल एक लाख ९२ हजार रुपयांची चुना लावण्याचा प्रकार समोर आला आहे. हे व्यापारी ठाण्याहून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होते. त्यावेळी त्यांना रस्त्यात अडवून त्यांच्यासोबत बोलबच्चन करून त्यांना फसविण्यात आले.**

याबाबतचे वृत्त असे की, मुलुंड मधील व्यापारी हरीश साळवे हे १२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२:००च्या सुमारास ठाण्याहून मुलुंडच्या दिशेने घरी चालले होते. त्यावेळी रस्त्यात त्यांना दुचाकी स्वाराने अडविले. दुचाकीवरून खाली उतरून त्यांनी आपण पोलीस असल्याचे त्यांना सांगितले. या ठिकाणी पुढे एका आरोपीला आम्ही शोधात असून तो तुमच्या वर्णनाचा असल्याचे साळवे यांना सांगून त्यांना त्यांच्या अंगावरील दागिने काढण्यास सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेवत साळवे यांनी अंगावरील सर्व दागिने काढले आणि रूमालात ठेवले. त्यानंतर पुढे देखील अशा प्रकारे पोलीस चौकशी सुरू आहे. तुम्ही त्यातले आरोपी वाटत नाहीत. परंतु गळ्यात आणि हातातील दागिने पाहिले तर तुम्हाला पुन्हा त्या ठिकाणी अडवून विचारपूस केली जाऊ शकते. असे सांगून भामट्यांनी हातचलाखी करून खोट्या दागिन्यांचा रुमाल साळवे यांच्या हातात दिला आणि तेथून पसार झाले. साळवे स्कूटरने मुलुंड पर्यंत पोहोचल्या नंतर त्यांनी रुमाल उघडून पाहिला असता त्यांना हे दागिने त्यांच्या मूळ दागिन्यांपेक्षा वेगळे असल्याचे दिसले. त्यानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी कोपरी पोलिसांकडे गुन्हा दाखल केला. चोरीला गेलेल्या दागिन्यांची किंमत एक लाख ९२ हजार रुपये असल्याचे साळवे यांनी पोलिसांना सांगितले. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# खासदार संजय राऊत यांच्या तसबिरीला जोडे मारून शिवसैनिकांनी केला निषेध

■ **होम टाइम्स टीम**

***बुधवारी मुलुंडमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळाले. शिवसैनिकांनी त्यांचा अर्धनग्न फोटो झळकावून त्यांच्या कृत्याचा निषेध केला. त्यांच्याविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी शिवसैनिकांनी. त्यांच्या अर्धनग्न फोटोला जोडे मारून आंदोलन केले.***

*खासदार संजय राऊत यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच शिवसैनिकांनी त्यांचा निषेध केला. मुलुंडमध्ये शिवसैनिकांकडून राऊत यांचा अर्धनग्न फोटो झळकावत त्यांच्या फोटोवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळाचा लोगो लावून हा निषेध करण्यात आला. राऊत यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. राऊत यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या वस्त्रावर भाजपचा लोगो असल्याच्या आशयाचे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्यावर शिवसेनेने बुधवारी हल्लबोल केला आणि राऊत यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच त्यांचा निषेध केला. राऊत यांनी अशी प्रक्षोभक वक्तव्ये त्वरित थांबविली नाहीत तर त्यांच्या घरासमोर जाऊन आणखी तीव्र प्रकारची निदर्शने करण्यात येतील असा इशाराही यावेळी शिवसैनिकांनी दिला.*

*संजय राऊत यांच्यावतीनेही उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने एकनाथ शिंदे गटाचा निषेध केला. राऊत यांची बदनामी करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा अशी मागणी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी केली.*

*आमदार रमेश कोरगावकर आणि खासदार संजय राऊत यांचे भाऊ आमदार सुनील राऊत यांनी मुलुंड पोलीस ठाण्यात येऊन पोलिसांनी काय कार्यवाही केली, याची माहिती घेऊन लवकरात लवकर या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पोलीस उपयुक्त पुरुषोत्तम कराड यांची भेट घेतली आणि संबंधितांवर कडक कारवाई करावी अशी मागणी सुनील राऊत यांनी केली. याप्रसंगी आमदार रमेश कोरगावकर आणि उबाठाचे शिवसैनिक मोठ्या संख्येने हजर होते. दरम्यान, शिंदे गटाने उद्धव ठाकरे गट यांचे शिवसैनिक आमने सामने आल्याने मुलुंडमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.*




> ***संजय राऊत यांनी ज्या पद्धतीने आमच्या नेत्यांवर टीका केली त्याला या पद्धतीने आम्ही उत्तर दिले आहे. तरीही राऊत यांनी अशाच पद्धतीने टीका करण्याचे सुरू ठेवले तर आम्ही तीव्र पद्धतीने निषेध करू. त्यांच्या घराबाहेर जाऊन आम्ही आंदोलन करू.***
>
> ***– जगदीश शेट्टी, मुलुंड विभाग प्रमुख***

> ***दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी. दोन दिवसात गुन्हा दाखल झाला नाही तर खासदार संजय राऊत यांना घेऊन पोलीस ठाण्यावर मोर्चा काढू.***
>
> ***– सुनील राऊत, आमदार***

# भांडुपमध्ये किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी

## एकाचा मृत्यू, सहा अटकेत

■ **होम टाइम्स टीम**

भांडुपमध्ये दोन गटात झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. भाऊबीजेच्या दिवशी किरकोळ वादातून घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे भांडुपमध्ये दिवाळीच्या सणाला गालबोट लागले आहे.

बुधवारी रात्री १२:३०च्या सुमारास भांडुप कोकण नगरात एक दुर्दैवी घटना घडली. या ठिकाणी असलेल्या एका निर्माणाधिन इमारतीच्या परिसरात सुरज भालेराव, ऋतिक शेलार, चेतन नाटेकर, आशिष वने, संग्राम जाधव नामक तरुण येथील जनता फ्लोअर मिल समोर पार्टी करत बसले होते. तेथे अनिकेत आंब्रे, स्वप्नील आंब्रे, विनय राऊत, गणेश कोलपाटे, मयूर कोटीयान उर्फ दूध, नितेश दिगंबर परब उर्फ चिचो नामक तरुण त्यांना चिडवत होते. या चिडवण्यावरून त्यांच्यात वाद झाले. नंतर शिवीगाळ आणि भांडण झाले. स्वप्नील आंब्रे याने संग्राम जाधव यास तोंडावर लोखंडी फाईटरने व डोक्यावर बियरच्या बाटलीने प्रहार करून त्याला जखमी केले. तसेच विनीत राऊत गणेश कोलपाटे, मयूर कोटीयान, नितेश परब यांनीही फिर्यादी आणि चेतन नाटेकर, आशिष वने, ऋतिक शेलार यांनाही लाकडी बांबूने मारहाण करून जखमी केले. अनिकेत आंब्रे याने सुरज भालेराव याच्या डाव्या बाजूस मानेवर, डोक्यावर पाठीमागील बाजूस पाठीवर चाकूने वार केले तसेच त्याच्या डाव्या काखेखाली चाकूने भोसकून भोसकले. त्यानंतर हे सर्वजण घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर याची माहिती पोलिसांना देण्यात आली. सुरज भालेराव यास अतिरक्तस्राव झाल्यामुळे त्यात त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर एकजण जखमी झाला पोलिसांनी आतापर्यंत या संपूर्ण प्रकरणांमध्ये सहा जणांना अटक केली आहे.

Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा

जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. – मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक



आरोग्य आशा

डॉ. मोनिषा रावत


## 'सुजोक'

# घसा खवखवणे (स्ट्रेप थ्रोट) हिवाळा ऋतूत

### नैसर्गिक मार्गाने औषधाशिवाय उपचार – १

घसा खवखवण्याकडे दुर्लक्ष करू नका, कारण ते गंभीर आजारांचे लक्षण असू शकते.





*देशात हिवाळ्याचे आगमन झालेय. तसेच, उष्णतेपासून आपण सगळ्यांना दिलासा मिळाल्याने आपण आनंदी आहोत आणि सणासुदीचा हंगामही सुरू झाला आहे, त्यामुळे आपण स्वत: ला निरोगी आणि उत्साही ठेवायला हवे. कारण कमी तापमानाची सुरुवात अनेक रोग घेऊन येते, त्यापैकी एक म्हणजे स्ट्रेप थ्रोट. स्ट्रेप थ्रोट हा घसा आणि टॉन्सिल्सचा संसर्गजन्य जीवाणूजन्य संसर्ग आहे. तो श्वसनाच्या थेंबाद्वारे आणि थेट संपर्काने पसरतो.*

**लक्षणे :–**

- गिळताना वेदना सोबत घसा दुखणे
- पू आणि पांढरे डाग असलेल्या टॉन्सिल्सची सूज आणि लालसरपणा
- तोंडाच्या आत, वरच्या भागावर लाल ठिपके असणे
- ताप
- डोकेदुखी
- जळजळ
- लिम्फ नोड्सची सूज
- उलट्या किंवा मळमळ (मोसिया)

*आमच्या **'मोनिषाज मंत्रा'** मध्ये आम्ही अनेक लोकांना त्यांच्या स्ट्रेप थ्रोट इन्फेक्शनपासून मुक्त होण्यासाठी कोणत्याही औषधाशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय खालील पद्धतींनी उपचार केले आहेत.*

**उपचार पद्धती**

- कोमट पाण्यात मीठ घालून दिवसभरात मधूनमधून ४–५ वेळा गुळण्या करा. जो सूज आणि वेदना कमी करण्यासाठी एक प्रभावी उपचार आहे.
- दिवसातून २–३ वेळा आले, मध, हळद आणि लिंबू मिसळून दाहक–विरोधी हर्बल चहा प्या.
- कोमट पाणी पिणे.
- भाज्यांचे गरम सूप पिणे.
- विश्रांती घ्या आणि चांगली झोप घ्या.

## सुजोक थेरपी




(चित्र १ प्रमाणे)

- **ऑक्यूप्रेशर –** अंगठ्याच्या डिस्टल सांध्याच्या आतील बाजूस घसा आणि टॉन्सिल क्षेत्रातील वेदनादायक बिंदू शोधा आणि डायग्नोस्टीक प्रोबने दिवसातून ३–४ वेळा एक मिनिट मालिश / मसाज करा.
- **बियाणे थेरपी –** रात्री झोपण्यापूर्वी घसा खवखवणे आणि हाताच्या अंगठ्यावर टॉन्सिलशी संबंधित बिंदूंवर चिकट टेपवर वाळलेले हिरवे वाटाणे लावणे. (चित्र २ प्रमाणे)




**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन** (ISA) **प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक : १. ऑनलाईन सुजोक–बेसिक** Ki (Level-I) २९/११/२३ ते ८/१२/२०२३, २. **निवासी मेरिडियन–सुजोक** Ki (Level-II) २/१२/२३ ते ४/१२/२०२३, ३. **ऑफलाइन सुजोक–बेसिक** (Level-I) ९/१२/२३ ते ११/१२/२०२३, ४. **ऑनलाईन मेरिडियन सुजोक** Ki (Level-II) १८/१२/२०२३ ते २८/१२/२०२३, ५. **निवासी मेरिडियन–सुजोक** Six Ki-1 (Level-III) ८/०४/२४ ते १३/०४/२०२४, , •Limited Seats Registration on First Cum First Basis.

**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**




# आरोग्य आणि मनोरंजन

## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

### १८ नोव्हेंबर २०२३ ते २४ नोव्हेंबर २०२३


*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल अ‍ॅन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन अ‍ॅक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*
**संपर्क :** ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com





■ **मेष** (अ, ल, इ)
तुमचे सर्व प्रिय आणि जवळचे लोक तुम्हाला स्वीकारतील. कोणीतरी तुम्हाला छान मदत करेल. **सल्ला:** सर्व ज्ञात आणि अनोळखी लोकांशी मैत्रीपूर्ण वागण्याचा प्रयत्न करा. नम्र व्हा आणि वृद्ध लोकांना मदत करा. तुमच्या स्मरणशक्तीकडे लक्ष द्या.




■ **कर्क** (ड, च, ह)
तुम्हाला काही कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. निरुपयोगी गोष्टींवर पैसा खर्च कराल. **सल्ला:** आशावादी आणि सामाजिक आणि निस्वार्थी व्हा. पक्षी आणि प्राण्यांना चारा. अंतर्दृष्टीकडे लक्ष द्या.




■ **तुळ** (र, ट)
समाधान मनःशांती देईल आणि तुम्ही चांगले काम कराल. **सल्ला:** तुमचे सामान तुमच्या प्रिय आणि जवळच्या लोकांसोबत शेअर करा. वाचन तुम्हाला मदत करेल म्हणून तुम्ही जे वाचता ते वाचून समजून घ्या. तुमच्या नफ्याकडे लक्ष द्या.





■ **मकर** (ख, ज)
तुम्हाला अनेक कल्पना येतील पण व्यावहारिकदृष्ट्या तुम्हाला यश मिळणार नाही. **सल्ला:** जास्त दूध किंवा बटर मिल्क प्या. पांढऱ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.





■ **वृषभ** (ब, व, य)
विश्वासू लोकांकडून तुम्हाला पाठिंबा मिळणार नाही. नियोजनापेक्षा परिस्थिती शक्तिशाली असेल. **सल्ला:** त्वरीत निर्णय घ्या आणि त्वरित कृती करा. वेळ आणि परिस्थिती जशी आहे तशी पाळण्याचा प्रयत्न करा. नवीन संबंधांकडे लक्ष द्या.




■ **सिंह** (म, ट)
कोणत्याही गोष्टीवर किंवा कोणावरही आनंदी होणार नाही. तुम्हाला बांधील वाटेल. **सल्ला:** एखाद्या पवित्र ठिकाणी किंवा मंदिराला भेट द्या. पक्षी किंवा प्राण्यांना खाऊ घालणे तुम्हाला मदत करेल. तुमच्या नवीन कल्पनांकडे लक्ष द्या.





■ **वृश्चिक** (न, य)
तुम्हाला जे हवे आहे ते तुम्हाला मिळेल आणि काही छुपे सत्य कोणीतरी उघड करेल. **सल्ला:** लोकांचे लक्षपूर्वक आणि स्पष्टपणे ऐका. तुमचे काम स्वतः करा आणि कोणावरही विश्वास ठेवू नका. तुमच्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष द्या.





■ **कुंभ** (ग, स, श)
तुमची भूतकाळातील कृत्ये पुन्हा वापरण्यासाठी तुम्ही खूप कठीण विचार कराल. **सल्ला:** जो काही आशा घेऊन तुमच्याकडे येतो त्याला मदत करा. हिरव्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या आनंदाकडे लक्ष द्या.




■ **मिथुन** (क, च, ज)
आपल्या मौलिकता आणि लवचिकतेसह आनंदी व्हाल. कोणीतरी फसवणूक करण्याचा प्रयत्न करेल. **सल्ला:** तुमचा अनुभव तुमच्या शिक्षकांना लक्षात राहील. भावना आणि शक्ती स्थिर राहतील. तुमच्या गुंतवणुकीकडे लक्ष द्या.




■ **कन्या** (प, ठ, ण)
भूतकाळातील चुका सुधारण्यासाठी पुरेसे मजबूत व्हाल आणि त्यामुळे तुम्हाला खूप मदत होईल. **सल्ला:** परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याच्यावर विश्वास आहे त्याचा सल्ला घ्या. तुमच्या इच्छाशक्तीकडे लक्ष द्या.




■ **धनु** (भ, ड, फ, ट)
तुम्हाला काही महत्त्वाचे दस्तऐवज आणि त्याद्वारे आनंद मिळेल. **सल्ला:** जास्तीत जास्त सोन्याचे दागिने घाला. वस्तू पिवळ्या रंगात वापरा. तुमच्या शब्दांकडे लक्ष द्या.




■ **मीन** (द, च, झ)
चांगली वेळ आहे आणि तुम्ही तुमच्या अनेक समस्या सोडवाल. **सल्ला:** तुमचा आनंद फक्त तुमच्या शुभचिंतकांना दाखवा. गुलाबी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या शांततेकडे लक्ष द्या.

# वीज प्रवाह खंडित करण्याची भीती दाखवून भामट्याने केली ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

■ होम टाइम्स टीम

**नागरिकांना मुलुंडमध्ये वरिष्ठ नागरिकांना टारगेट करून लुबाडणूक होणे थांबलेले नाही. अजूनही अशा मुलुंडमध्ये मोठ्या प्रमाणात अशा फसवणुका होत आहेत. भोळ्या नागरीकांना लाखो रुपयांचा गंडा घातला जात आहे. नवघर पिस ठाण्याच्या हद्दीत असाच प्रकार घडला आहे. महावितरणाचा कर्मचारी असल्याचे भासवून त्याने एका वरिष्ठ नागरिकाला फसवले आहे.**

या गुन्हेगारांकडून दुपारच्या वेळी महावितरणाचे बिल भरण्याचे मेसेज केले जातात आणि त्याच वेळेत घरात कोणी नसल्यामुळे वरिष्ठ नागरिकांकडून ऑनलाईन पेमेंट करण्यास भाग पाडले जाते आणि त्यांचा क्रमांक हॅक करून पुढे लाखोंची लूट केली जात आहे.

नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गुन्हेगाराने ऑनलाईन पेमेंट करण्याच्या नावाखाली वरिष्ठ नागरिकाचा मोबाईल हॅक करून त्यांच्या दोन एफडी मधील पैसे काढून घेतले. ही रक्कम त्या भामट्याने स्वतःच्या विविध खात्यात वळती केली. ऐन दिवाळीच्या सणांमध्ये विद्युत पुरवठा खंडित होऊ नये यासाठी मुलुंड पूर्वेकडील रघुनाथ कळमकर यांना दुपारच्या वेळी आलेला मेसेज त्यांनी गांभीर्याने घेतला. या मेसेजमध्ये जोशी नावाच्या एका महावितरणाच्या अधिकाऱ्याचा क्रमांक देखील देण्यात आला होता. त्यानुसार करमळकर यांनी या क्रमांकावर संपर्क साधून नक्की आपण केलेले महावितरणाचे पाच हजार रुपयांचे पेमेंट वळते का झाले नाही, या संदर्भात विचारणा केली. परंतु सदर अधिकाऱ्याने तुमच्या बिल पेमेंटचे पैसे ऑनलाईन रिफ्लेक्ट झाले नसल्याचे त्याने सांगितले. त्यामुळे पुन्हा त्यांना एक लिंक पाठवून त्यावर पेमेंट करण्यास सांगितले. त्यानुसार रघुनाथ यांनी त्यांच्या मोबाईलवर आलेली ती लिंक उघडण्याचा प्रयत्न केला. परंतु ती लिंक उघडली नसल्यामुळे त्यांनी त्यांच्या पत्नीच्या मोबाईलवर ती लिंक उघडून तेथून पेमेंट केले. या अकाउंट वर त्यांच्या पत्नीच्या दोन एफडी बँकेत जमा होत्या. त्यामुळे काही वेळाने त्यांच्या खात्यातील एफ डी मधून दुसऱ्या एका अकाउंट मध्ये एफडी तोडून पैसे वळते झाले असल्याचे मेसेजेस आले. असे मेसेज आल्यानंतर आपली फसवणूक झाली असल्याचे रघुनाथ यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या संदर्भात नवघर पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली. परंतु ऐन दिवाळीच्या दिवसांमध्ये विद्युत प्रवाह खंडित होऊ नये यासाठी घेतलेली खबरदारी या कुटुंबीयांची आर्थिक फसवणूक करणारी ठरली.

अशा प्रकारचे मेसेजेस गुन्हेगारांकडून दुपारच्या वेळेस केले जातात किंवा संपर्क करण्याची वेळ देखील शक्यतो दुपारची असते. अशा वेळी बहुतांश नागरिक झोपेत असतात. त्यामुळे झोपेत चुकून एखादे ट्रांजेक्शन होण्याचा जास्त धोका असतो. त्याचाच फायदा ऑनलाइन सायबर गुन्हेगारांकडून घेतला जातो. त्यामुळे नागरिकांनी अधिक सजग होणे आवश्यक आहे. त्यांनी ऑनलाईन व्यवहार करताना अधिक काळजी घ्यायला हवी असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# फेरीवाल्यांचे पात्रता धोरण ठरेना

(पान १ वरून)

त्याला मंजुरी मिळाल्यानंतर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली टाऊन व्हेंडिंग समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्यानंतर समिती सदस्यांचीही निवड केली जाईल. २० जून २०२३ रोजी प्रशासनाने ३२ हजार ४१५ फेरीवाल्यांची पात्रता यादी जाहीर केली होती आणि त्यावर १४ जुलैपर्यंत सूचना आणि हरकती मागवल्या होत्या. एकीकडे ३२ हजार फेरीवाल्यांच्या यादीबाबत फेरीवाला संघटनेने विरोध दर्शविला, तर दुसरीकडे महिना उलटून गेला तरी या फेरीवाल्यांबाबत कोणताही निर्णय होत नसल्याने फेरीवाल्यांमध्ये नाराजी आहे.

मुंबईत फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे फेरीवाले सांगतात. महिना उलटूनही प्रशासनाकडून यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, यामुळे पुन्हा हे सर्वेक्षण करून नंतर अंतिम सर्वेक्षण यादी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना देण्यात यावी. एकीकडे मनपाकडून बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई होत असताना दुसरीकडे मात्र फेरीवाल्यांना पात्र ठरवण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे पालिकेला फेरीवाल्यांची समस्या सोडवायचा की नाही हे कळायला मार्ग नाही, असे फेरीवाल्यांकडून सांगितले जात आहे.

# प्रदूषण रोखण्यासाठी पालिका नेमणार क्लीन अप मार्शल

■ होम टाइम्स टीम

शहर अस्वच्छ करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या क्लीन अप मार्शल आणि लोकांमधील वाद विकोपाला जाण्याच्या भीतीने पालिकेकडून बंद करण्यात आलेली ही सेवा आता पुन्हा सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे आता क्लीन अप मार्शल रस्त्यांवर घाण करणाऱ्यांवर नजर ठेवणार आहेत. मात्र पुन्हा क्लीन अप मार्शल आणि लोकांमध्ये वाद होऊ नयेत यावर पालिकेला लक्ष ठेवावे लागणार आहे.

महानगरपालिकेकडून यापूर्वी स्वच्छता राखण्यासाठी आणि अस्वच्छता करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी क्लीन अप मार्शलची नियुक्ती करण्यात आली होती. परंतुकाही वादामुळे ही नियुक्ती मागे घेण्यात आली होती. परंतु मुंबईत प्रदूषणाने धोकादायक पातळी ओलांडल्यानंतर प्रदूषण करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पालिका प्रशासनाकडून क्लीन अप मार्शलची नियुक्ती करण्यात येत आहे. प्रत्येक वार्डामध्ये २५ ते ३० पर्यंत मार्शलची नियुक्ती केली जाणार आहे. हे मार्शल उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर तसेच अनावश्यक रीत्या प्रदूषणास हातभार लावणारी कृत्य करणाऱ्यांवर करवाई करणार आहेत. तसेच इमारतींच्या साईटवर प्रदूषण रोखण्यासाठी पालिका प्रशासनाकडून जारी करण्यात आलेल्या नियमावलीचे पालन केले जात आहे कि नाही याची पाहणी करणार आहेत. या पाहणीत कुठल्याही प्रकारचा दोष आढळून आला तर त्यांच्यावर क्लीन अप मार्शल कडून कारवाई केली जाणार आहे. पालिकेने यापूर्वी मुंबईत सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर थुंकणे, नैसर्गिक विधी करणे, कचरा-अस्वच्छता करणार्यांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने क्लिनअप मार्शलची नियुक्ती केली होती. मात्र या क्लिनअप मार्शलकडून कारवाईमध्ये भेदभाव करून भ्रष्टाचारकरत असल्याचे चित्र समोर आले होते. माजी नगरसेवकांनी देखील या क्लिनअप मार्शल योजनेच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. त्यानंतर ही योजना पालिकेला बंद करावी लागली होती. परंतु शहरातील वाढते प्रदूषण विचारात घेता पालिकेने पुन्हा एकदा 'क्लिन अप मार्शल' नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या मार्शलवर अस्वच्छेतेसोबतच प्रदूषण रोखण्याची जबाबदारी दिली आहे.

> ***या आधी देखील मुंबई महानगरपालिकेने क्लीन अप त्रास सहन करावा लागत होता. हे क्लीन अप मार्शल मनमानी पद्धतीने लोकांकडून वसुली करताना आढळून येत होते. त्यामुळे स्वच्छता ठेवणे, प्रदूषण रोखण्यास हातभार लावणे या गोष्टी चांगल्याच आहेत, परंतु जर क्लीन अप मार्शल नेमायचे असतील तर त्यांचा संपूर्ण क्रिमिनल रेकॉर्ड तपासणे गरजेचे आहे.***
>
> ***– प्रदीप जैन, नागरिक***

CALL CENTER
**022 66211333**

E-MAIL ID
**customerservice@homenet.net**

FACEBOOK MESSENGER
**HomeNet / @homenet.net**

**Facebook Messenger Scan Code:** To get in touch, simply scan a code using the Messenger app.

**HOME NET**
**www.homenet.net**

WOW!
DOUBLE MAZZA!!
uploads & downloads at same speed, since 2010
now @ ₹194/-*
Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free
67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

67 PE OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

HOME FIBER
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

### HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps
** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store | GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80. **Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**